महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०७ वे | दिनांक : २१/०७/२०२६ | वार : मंगळवार

## 'विश्वगुरू झुरळांना घाबरतात!': दिल्लीतील दडपशाहीवरून सुषमा अंधारेंचा घणाघात



**मुंबई :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजधानी दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली संसदेवर धडक मोर्चा काढण्यात आला. संसद भवनाजवळ पोहोचलेल्या या आंदोलकांना रोखण्यासाठी आणि पांगवण्यासाठी पोलिसांकडून बळाचा वापर करत अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, पोलिसांच्या या दडपशाहीवरून आता राजकीय वातावरणही तापले असून, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या कारवाईचा तीव्र निषेध करत केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सडकून टीका केली आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या, दिल्लीतील आंदोलनाची बातमी आपल्या सगळ्यांच्या माध्यमातून बघायला मिळत आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाहीवादी देश आहे. आंदोलकांचा प्रश्न चर्चेतून सोडवता आला असता. पण प्रश्न चर्चेच्या पातळीवर सोडवण्याऐवजी सोनम वांगचुक यांना ज्या प्रकारे उचलले त्यातून आंदोलन मोडून काढण्यावर जास्त भर दिल्याचे दिसत आहे. पांढऱ्या चादरी घेऊन सोनम वांगचुक यांना हटवण्याचा प्रयत्न झाला. आपल्याकडे पांढऱ्या चादरी कधी वापरल्या जातात? शेवटच्या क्षणी. लोकशाही शेवटचा घटका मोजत आहे. लोकशाहीचा मुडदा उचलायचा आहे, अशा पद्धतीने पांढऱ्या चादरी वापरल्या गेल्या.

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, आज सुद्धा पाण्याचे फवारे. लाठीचार्जसाठी सरकार सज्ज आहे. जे लोक पाकिस्तानबरोबर चर्चा केली पाहिजे असे म्हणतात ते आपल्याच देशातील नागरिकांशी चर्चा करायला घाबरतात. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही नंतरची गोष्ट, पण तुम्ही छत्रच करायला घाबरत आहात. याचा अर्थ विश्वगुरु झुरळांना घाबरतात. हे फार चिंताजनक आहे, या देशात लोकशाही संपलेली आहे.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी अभिजीत दिपके यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. यावर बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, आम्ही सगळे सीजेपी सोबत आहोत. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे वारंवार संपर्कात आहेत. अभिजीत दिपके, सोनम वांगचुक यांच्याबरोबरच 18 जणांशी आम्ही संपर्क साधला असून चर्चा केली आहे, अशी माहिती अंधारे यांनी दिली आहे.

## 'नीट पेपरफुटीचे आंदोलन म्हणजे निव्वळ नौटंकी - चंद्रशेखर बावनकुळेंची टीका



**मुंबई :** राजधानी दिल्लीत सोनम वांगचुक तसेच अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात नीट पेपरफुटी प्रकरणी मोठे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला महाराष्ट्रातून देखील विरोधी पक्षांकडून तसेच विविध विद्यार्थी संघटनांकडून पाठिंबा दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर भाजप नेते व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत ही सगळी नौटंकी असल्याची टीका केली आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, असे आंदोलन पेटवण्याचे काम कधीच नाही केले. एक विचार असा आहे जो पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना डॅमेज करण्यासाठी, देवेंद्र फडणवीस यांना डॅमेज करण्यासाठी असा समाजात एक गट निर्माण झाला आहे. या गटाला दिवसभर काम करायचे आहे. त्यामुळे कॉकरोच वगैरे आंदोलन सगळी नौटंकी आहे. काही मुद्दे मिळत नाही म्हणून लोकांच्या मनात द्वेष निर्माण करण्याचे काम सुरू आहे. काही मुलांना मनस्ताप झाला आहे म्हणून देखील ते तिथे सहभागी झाले आहेत. याचा अर्थ असा नाही की सरकारने यावर काही कारवाई केली नाही. आमच्या मंत्र्यांनी पेपर लीक केला आहे का? चंद्रशेखर बावनकुळे किंवा धर्मेंद्र प्रधानजींनी पेपर लीक केला आहे का? असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सिस्टममध्ये कोणीतरी बदमाशी केली आणि त्याची शिक्षा त्याला मिळाली आहे. सरकारने योग्य आणि कडक कारवाई केली आहे. तसेच सरकारने पुन्हा एकदा नीट परीक्षा घेतली आहे. तुम्ही सुधारणा सुचवायला पाहिजे, पण या पद्धतीने, जेव्हा सरकारने आधीच कारवाई केली आहे आणि तरी तुम्ही मंत्र्यांचा राजीनामा मागून या ठिकाणी राजकारण करत आहात, अशी टीका बावनकुळे यांनी केली आहे.

उद्धव ठाकरे यांनी अयोध्या राम मंदिरात जो प्रकार घडला त्यावरून संघावर टीका केली होती. यावर प्रश्न विचारला असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, अनेक मंदिरांमध्ये कधी कधी चोरी होते. आता मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिरात जेव्हा चोरी झाली तेव्हा कोणाचा अध्यक्ष होता? उद्धव ठाकरेंचा अध्यक्ष होता. मग तेव्हा उद्धव ठाकरेंचा राजीनामा मागितला का आम्ही? अयोध्या राम मंदिरात चोरी झाली, त्यावर लोकांना पकडले जात आहे. कडक कारवाई केली जात आहे. एखाद्या मंदिराच्या कर्मचाऱ्याने चोरी केली आणि तुम्ही अध्यक्षांचा राजीनामा मागत आहात, नीट पेपरफुटी प्रकरणी मंत्र्यांचा राजीनामा मागत आहेत, हे जे राजकारण चालू आहे, उद्धव ठाकरेंची नौटंकी आहे.

उद्धव ठाकरे यांनी राम मंदिरात आमंत्रण देण्यात आले होते. मात्र तेव्हा मतांच्या लांगूलचालनासाठी ते तिथे आले नाहीत. महाराष्ट्रात काही मते कमी होतील म्हणून ते आले नाहीत. तुम्ही भगवान रामचंद्रांचा आयुष्यभर तिरस्कार केला आणि आता तुम्ही असे आंदोलन करून काहीही मिळणार नाही, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.

## कल्याण-डोंबिवलीत 'केडीएमटी'ची बससेवा ठप्प : कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन




**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या परिवहन सेवेचे ब्रीदवाक्य 'सेवेशी तत्पर' असे असले तरी, आज ही सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. कंत्राटदाराने कोणतीही पूर्वकल्पना न देता पगारातून रक्कम कपात केल्याचा आरोप करत कंत्राटी चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांनी अचानक बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. या संपामुळे केडीएमटी डेपोतून एकही बस रस्त्यावर न उतरल्याने ऐन गर्दीच्या वेळी प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत, मनसेचे कल्याण जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी प्रशासनाला आक्रमक इशारा दिला असून, कर्मचाऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन सेवेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारातून कोणतीही पूर्वकल्पना न देता मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आल्याने मोठा असंतोष निर्माण झाला आहे. या अवाजवी कपातीबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संबंधित पालिका अधिकारी आणि कंत्राटदाराकडे लेखी स्वरूपात स्पष्टीकरण मागितले होते. मात्र त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे आणि दुर्लक्षित वृत्तीमुळे संतप्त झालेल्या सर्व कंत्राटी चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा घेत थेट बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे.

कर्मचाऱ्यांच्या या अचानक पुकारलेल्या संपामुळे केडीएमटीची बससेवा पूर्णपणे ठप्प झाली असून, डेपोतून एकही बस बाहेर न पडल्याने सकाळपासूनच कल्याण आणि डोंबिवलीकर प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मनसेचे कल्याण जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी कामगारांची पिळवणूक करणाऱ्या कंत्राटदाराला तात्काळ काळ्या यादीत टाकण्याची जोरदार मागणी केली आहे.

तसेच, कर्मचाऱ्यांच्या कपात केलेल्या आणि थकीत वेतनाचा प्रश्न तातडीने न सोडवल्यास पालिका अधिकारी व कंत्राटदाराला डेपोमध्ये प्रवेश करू देणार नाही, असा आक्रमक इशाराही मनसेकडून देण्यात आला आहे. आता या संपावर प्रशासन आणि कंत्राटदार नेमकी काय भूमिका घेतात व प्रवाशांची होणारी गैरसोय कधी दूर होते, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ जुलै २०२६


## जेईएस महाविद्यालय जालनाच्या उपप्राचार्यपदी डॉ. बिक्कड



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना च्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी प्रा. डॉ. सुमंत बिक्कड यांची नियुक्ती करण्यात आली असून याबद्दल त्यांचे जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्री.श्रीनिवास भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड यांचा महाविद्यालयातील मित्र मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक डॉ.फुलचंद मोहिते, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ.राजेंद्र सोनवणे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वसंत पवार, डॉ लक्ष्मण दळवे, प्रा. परशूराम चौरे,प्रा अनिल घात्रे. श्री. अनिल इंगळे आदी उपस्थित होते.

## लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांचा जालना येथील शाळेत सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** जालना येथील भिलदरी शिक्षण संस्थेच्या वतीने राजश्री शाहू विद्यालय व ज्युनिअर कॉलेज चौधरी नगर जालना येथे प्रा. डॉ. सुखदेव मांटे आणि त्यांची सुविध्य पत्नी व मुख्याध्यापिका मिस यांनी मराठवाड्याचे लोकप्रिय व लढवय्ये शिक्षक आमदार माननीय विक्रमजी काळेसाहेब यांच्या समोर शाल, श्रीफळ, पुष्पहार बुके देऊन प्रसिद्ध लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांचा यथोचित गौरव केलेला आहे.

यांप्रसंगी कवी मनोज खुटे, प्रदीप विखे, मुदस्सर पठाण, वाहेद शेख, विक्रमजी काळेसाहेब यांचे पीए प्रथमेश आणि शाळेतील शिक्षक-शिक्षिका तसेच विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इकरा बोरनार येथे रंग भरो स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाला मुक्त आविष्कार




**बोरनार (प्रतिनिधी) :** इकरा एज्युकेशन सोसायटी, जळगाव संचलित अब्दुल मजीद सालार ईकरा उर्दू हायस्कूल, बोरनार येथे विद्यार्थ्यांमध्ये चित्रकलेची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने 'रंग भरो स्पर्धे'चे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व शिस्तबद्ध वातावरणात सहभाग नोंदवून स्पर्धेला रंगत आणली.शाळेचे मुख्याध्यापक आरीफ एम. खान सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. ड्रॉइंग क्लब प्रमुख शेख रोशन सर यांच्या नेतृत्वाखाली फिरोज एफ. पठाण सर व जव्वाद अंजुम सर यांनी स्पर्धेचे नियोजन, विषय निवड, विद्यार्थ्यांचे गट विभाजन व संपूर्ण आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले.स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांची ज्युनिअर (इयत्ता पाचवी ते सातवी) व सिनिअर (इयत्ता आठवी ते दहावी) अशा दोन गटांमध्ये विभागणी करण्यात आली. ज्युनिअर गटातील विद्यार्थ्यांना 'Save Tree' या विषयावरील तर सिनिअर गटातील विद्यार्थ्यांना 'वृक्षारोपण' या विषयावरील चित्रे रंगविण्यास देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आकर्षक रंगसंगती, कल्पकता आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश आपल्या चित्रांमधून साकारला. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतीतून वृक्षांचे महत्त्व, हरित पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे मांडला.स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. प्रत्येक विद्यार्थ्याने आपली कला, सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती यांचा उत्कृष्ट आविष्कार सादर केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन करत त्यांचा आत्मविश्वास वाढविला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत झाली, तसेच पर्यावरण संरक्षणाची जाणीव अधिक दृढ झाली.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मजहर खान सर, सादिक सर, अमीर सर, आबिद सर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शिक्षकेतर कर्मचारी लिपिक आकिब शेख, शिपाई मुस्ताकभाई आणि युसुफभाई यांनीही आयोजनात मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या स्पर्धेत यशस्वी विद्यार्थ्यांचे नाव खालील प्रमाणे आहे. ज्यू.ग्रुप मध्ये प्रथम जकीया शेख जहूर (सातवी) द्वितीय रोजीना अल्ताफ मन्यार (सहावी) तृतीय अल्फिया नेहाल मन्यार तसेच सीनियर ग्रुप मध्ये प्रथम क्रमांक आफरीन शेख रईस(दहावी) द्वितीय इरम इकबाल पटेल (आठवी) तर तृतीय क्रमांक अल्फिया शेख मेहबूब (नववी) यांनी पटकावला.

स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद यांनी मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. भविष्यातही उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ जुलै २०२६


## मा. संजयजी गंभीरे सर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!




**बीड (अंबाजोगाई - भगवंत पाळवदे)** : शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील एक नावलौकिक व आदरणीय व्यक्तिमत्व मा. संजयजी गंभीरे सर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'संकल्प विद्या प्रतिष्ठान'च्या वतीने रविवार, दिनांक १९ जुलै २०२६ रोजी भव्य तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या नऊ वर्षांपासून अविरतपणे सुरू असलेल्या या उपक्रमाला यंदाही विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा प्रचंड व उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दिवसेंदिवस या परीक्षेची लोकप्रियता आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढत असल्याचे या वर्षी पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.या अत्यंत चुरशीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, विविध गटांतून प्राविण्य मिळवलेले विजेते विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत:■ गट: दुसरी ते चौथीप्रथम क्रमांक: शिंपले निधाय अमोल (९८ गुण)द्वितीय क्रमांक: चाटे श्रेया श्रीकांत व मुसळे श्रुती आदिनाथ (प्रत्येकी ९६ गुण)तृतीय क्रमांक: शेटे ईश्वरी किरण (९२ गुण)■ गट: पाचवी ते सातवीप्रथम क्रमांक: देशमुख मुकुंदराज वैभव (७८ गुण)विजेते द्वितीय क्रमांक: भाबरडोर्डे भूमिका बिजयशिंग, सुरवसे शौर्य शिवाजी आणि लाड स्वरूप गणेश (प्रत्येकी ७६ गुण)तृतीय क्रमांक: कदम गौरी शिवशंकर (७४ गुण)■ गट: आठवी ते दहावीप्रथम क्रमांक: गडदे अमृता गोविंद (५२ गुण)विजेते द्वितीय क्रमांक: जाधव अर्णव अशोक, जाधव प्रतीक कैलास आणि घाडगे शौर्य व्यंकटेश (प्रत्येकी ५० गुण)तृतीय क्रमांक: दावलबाजे शिवम मारोती (४६ गुण) कौतुकाचा वर्षाव: विद्यार्थ्यांमध्ये सामान्य ज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि स्पर्धा परीक्षांचा पाया शालेय वयातच मजबूत व्हावा, या उद्देशाने संकल्प विद्या प्रतिष्ठान गेली नऊ वर्षे हे कौतुकास्पद कार्य करत आहे.

स्पर्धेत यश मिळवून तालुक्यातून गौरविण्यात आलेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मा. संजयजी गंभीरे सर, प्रतिष्ठानचे पदाधिकारी, शिक्षक व परिसरातील नागरिकांकडून जाहीर कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## ब्रम्हकमळ

ब्रम्हकमळ फूल
दुर्मिळ दिसती
विष्णू शिवाचे लाडके
म्हणून देव पुष्प म्हणती

वर्षातून एकदाच
रात्रीला उमलते
सुगंध दरवळीत
पहाटे कोमेजते

आयुर्वेदही गातो
या फुलाचे गुणगान
धार्मिक कार्यात
महत्वाचे स्थान

ब्रम्हकमळ फूल
जन्मते हिमालयात
सुखसमृद्धी व शांती
वाढविते घराघरात

चंद्राच्या प्रकाशात
अधीकच खुलते
पांढऱ्या रंगात
तेज फुलाचे झळकते




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## पालघरमध्ये थरारक दरोडा : भरदिवसा बंदुकीच्या धाकावर सराफा दुकान लुटले




**मुंबई** : पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या इराणी नगर परिसरातील 'लक्ष्मी ज्वेलर्स' या सोन्याच्या दुकानावर तीन अज्ञात दरोडेखोरांनी भरदिवसा बंदुकीच्या धाकावर धाडसी दरोडा टाकला. हातात शस्त्र घेऊन आलेल्या या टोळीने दुकानातील लाखो रुपयांचे सोन्याचे दागिने गोळा करून एका पोत्यात भरले आणि घटनास्थळावरून पळ काढला. गजबजलेल्या भागात आणि दिवसाढवळ्या घडलेल्या या धक्कादायक प्रकारामुळे डहाणूसह संपूर्ण परिसरातील सराफा व्यावसायिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, हा संपूर्ण थरार डहाणूच्या इराणी नगरमधील 'लक्ष्मी ज्वेलर्स' या सोन्याच्या दुकानात घडला. दरोड्याची ही संपूर्ण घटना समोरील एका दुकानाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

दरोडेखोर पूर्ण तयारीनिशी आले होते. दुकानात प्रवेश करताच एका दरोडेखोराने हातात बंदूक घेऊन थेट मुख्य दाराचा ताबा घेतला, जेणेकरून कोणीही आत येऊ शकणार नाही किंवा बाहेर जाऊ शकणार नाही. दारात एकाने पहारा दिला असताना, त्याच्या इतर दोन साथीदारांनी दुकानात घुसून मालकाला शस्त्राचा धाक दाखवला आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर शोकेस आणि लॉकरमधील सोन्याचे मौल्यवान दागिने एका मोठ्या पोत्यात भरण्यास सुरुवात केली. दुकानात उपलब्ध असलेले बहुतांश दागिने पोत्यात कोंबून दरोडेखोरांनी काही मिनिटांतच दुकानाचा ताबा मिळवला.

दुकानातून लाखोंच्या किमतीचे सोने पोत्यात भरल्यानंतर, दोन्ही दरोडेखोर बाहेर आले आणि दारात बंदुकीसह उभे असलेल्या आपल्या तिसऱ्या साथीदारासह दुचाकीवरून अत्यंत वेगाने घटनास्थळावरून पसार झाले.

या चोरट्यांनी अत्यंत हुशारीने स्वतःचे चेहरे कापडाने पूर्णपणे बांधले होते. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असले, तरी आरोपींचे चेहरे स्पष्टपणे ओळखता येत नाहीत. हा पूर्वनियोजित कट असावा आणि आरोपींनी परिसराची आधी रेकी केली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे.

भरदिवसा सोन्याच्या दुकानावर दरोडा पडल्याची माहिती मिळताच संपूर्ण पालघर पोलिस दलात खळबळ उडाली. डहाणू पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि पालघर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास यंत्रणा वेगाने फिरू लागल्या आहेत. सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर स्थानिक नागरिकांनी आणि व्यापारी संघटनांनी या दरोडेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिस सध्या आजूबाजूच्या परिसरातील आणि महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेज खंगाळत असून आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ जुलै २०२६


## सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ला सहन करणार नाही : मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंकडून आश्वासन



**नागपूर :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांबाबत कठोर इशारा दिला आहे. कर्तव्य बजावत असताना कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत, असे ते नागपूर येथील नियोजन भवनात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले. कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यातील मुद्रांक निरीक्षक मारहाण प्रकरणाचा संदर्भ देत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, या प्रकरणात दोषींवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. अधिकारी चुकीचे वागत असल्यास तक्रार करण्याची व्यवस्था आहे; मात्र कायदा हातात घेणे खपवून घेतले जाणार नाही. तसेच, संपावर गेल्याने राज्याच्या महसुलाचे नुकसान होत असल्याने मुद्रांक विभागातील कर्मचाऱ्यांनी संपावर जाऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.

पक्षाच्या लेटरपॅडच्या वापराबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना कडक सूचना दिल्या. लेटरहेडचा वापर केवळ समाजहित आणि जनसेवेसाठीच झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. ट्रक माफिया, सट्टा, गोहत्या, अंमली पदार्थ किंवा इतर बेकायदेशीर कृत्यांना पाठबळ देण्यासाठी लेटरपॅडचा वापर करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही बावनकुळे यांनी दिला आहे.

नीट आंदोलनावरही त्यांनी भाष्य केले. हे आंदोलन ठोस मुद्द्यांवर आधारित नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी जाणीवपूर्वक रचलेले राजकीय षड्यंत्र असल्याचा आरोप त्यांनी केला. पेपरफुटी प्रकरणात दोषींवर सरकारने आधीच कठोर कारवाई केली आहे. एखाद्या कर्मचाऱ्याच्या चुकीसाठी संपूर्ण व्यवस्थेला किंवा मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करणे चुकीचे असून, विरोधक केवळ युवकांची दिशाभूल करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.






## पुण्यात महाविद्यालयीन तरुणीवर चार मित्रांकडून वर्षभर सामूहिक अत्याचार



**पुणे :** महिलांवरील तसेच महाविद्यालयीन तरुणींवर लैंगिक अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. पुण्यातील एका महाविद्यालयीन तरुणीवर चौघांकडून लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे सलग एक वर्ष या तरुणीवर चार मित्रांकडून लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत या नराधमांनी तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे समजते. अखेर या त्रासाला कंटाळून तरुणीने वाघोली पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पीडित तरुणीच्या फिर्यादीवरुन वाघोली पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. फरहान शेख, फजल शेख, रेहान शेख आणि साहिल अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणी ही पुण्याच्या विमान नगर परिसरात वास्तव्यास आहे. 2025 मध्ये या तरुणीने पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. याच ठिकाणी तिची ओळख या प्रकरणातील मुख्य आरोपी फरहान शेख याच्याशी झाली. पुढे या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. मात्र, याच विश्वासाचा आणि मैत्रीचा गैरफायदा घेत फरहानने आपल्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक आरोप या महाविद्यालयीन तरुणीने केला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, केवळ एकानेच नव्हे तर या प्रकरणातील चौघांनी मिळून गेल्या वर्षभरापासून विविध ठिकाणी तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले आहेत. या खळबळजनक घटनेची गंभीर दखल घेत पुणे पोलिसांनी तत्काळ कारवाई केली असून प्रकरणातील चारही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा सविस्तर तपास सुरू आहे. मात्र, शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्यात उघडकीस आलेल्या या धक्कादायक घटनेमुळे सर्वत्र तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मुंबईची लाईफलाईन असलेल्या लोकल ट्रेनमध्ये महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अंबरनाथहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लोकलमध्ये उल्हासनगर ते विठ्ठलवाडी स्थानकादरम्यान सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास एका मद्यपीने थेट महिलांच्या डब्यात घुसून जोरदार धिंगाणा घातल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ऐन गर्दीच्या वेळी घडलेल्या या प्रकारामुळे डब्यातील महिला प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर विठ्ठलवाडी स्थानक येताच इतर प्रवाशांनी सतर्कता दाखवत या मद्यपीला पकडले आणि रेल्वे पोलिसांच्या स्वाधीन केले. सुदैवाने यात कोणताही अनर्थ घडला नसला तरी, या खळबळजनक घटनेमुळे रेल्वे प्रवासातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## जिल्हाधिकारी गौडांचे आवाहन: 'स्वच्छ वारी'चा संकल्प करा

**छत्रपती संभाजीनगर :** आषाढी एकादशीनिमित्त वाळूज पंढरपूर येथील विठ्ठल मंदिरात मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. या यात्रेच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता आणि सुरक्षा उपाययोजनांना प्राधान्य देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे. यंदाची वारी 'स्वच्छ वारी' म्हणून साजरी करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यात्रोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस उपआयुक्त पंकज अतुलकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दीपक शिंदे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती मस्के यांच्यासह मंदिर प्रशासन, ग्रामपंचायत, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यात्रोत्सवादरम्यान भाविकांना फराळ वाटप करण्यासाठी १३ ठिकाणी स्टॉल्स उभारले जाणार आहेत. प्रत्येक स्टॉलवर स्वयंसेवक आणि कचरा संकलनासाठी कचराकुंड्या उपलब्ध असतील. भाविकांनी टाकलेला कचरा उचलण्यासाठी स्वच्छता स्वयंसेवक आणि सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाईल. तसेच, घंटागाड्या व कचरा संकलन करणाऱ्या वाहनांची व्यवस्था ठेवण्यात येणार आहे. यात्रेतील गर्दी लक्षात घेता, ४ पाळ्यांमध्ये एकूण ३४२० स्वयंसेवकांची आवश्यकता असून, त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना तसेच स्वयंसेवी नागरिकांनी सेवा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यात्रा परिसर आणि मंदिरात एकूण ६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत, ज्याद्वारे पोलीस यंत्रणा यात्रेवर लक्ष ठेवेल. याशिवाय, एआय तंत्रज्ञानाचा वापर करून यात्रेकरूंची संख्या मोजली जाईल, अशी माहिती पोलीस उपआयुक्त पंकज अतुलकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी गौडा यांनी रहदारी व्यवस्थापन, प्रकाश व्यवस्था, वीज पुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा, अन्न नमुने तपासणी आणि आरोग्य पथके यांच्या उपलब्धतेबाबत निर्देश दिले. तसेच, आवश्यक पोलीस बळ पुरवण्याबाबतही सूचना देण्यात आल्या. यंदाची वारी 'स्वच्छ वारी' म्हणून यशस्वी करण्यासाठी सर्वांनी संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी पुन्हा केले.